भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०२/२०१८

**१) अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक जखमी :-**

दिनांक ११/०२/२०१८ चे २०.३० ते २१.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने , निष्काळजीपणे चालवुन मृतक – पिंताबर बबनजी तोंडरे वय २४ वर्ष व त्याचे सोबतचा जखमी इसम अतुल लक्ष्मण भुते वय २७ वर्ष दोन्ही रा. रोहणी ता. लाखांदुर यांचे हिरो पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ०४७१ ला धडक मारून अपघातास कारणीभुत होवुन अपघाताची सुचना न देता पळुन गेला, अपघातामध्ये पितांबर तोंडरे याचे जागीच मरणास कारणीभुत झाल्याने,यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनि. बोरखडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) मोटार पंपची चोरी . :-**

दिंनाक १०/२/२०१८ चे १८.०० ते दि. ११/०/२०१८ चे ११.०० वाजता यातील फिर्यादी अशोक ईश्वर मेंढे वय ४५ वर्ष रा. मोहरणा याचे शेतातील विहीरीत पिकांना पाणी देण्यासाठी रोहणा शेत शिवारातील सि.आर. आय. कंपनीची ३ एचपी मोटार पंप कि. ५०००/रु. ची लावलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३८९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. तलमले पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) वैनगंगा नदीचे पात्रात इसमाचे प्रेत मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद. :-**

दिनांक १२/०२/२०१८ चे ०८.३० वाजता. यातील फिर्यादीने पो.स्टें. ला येवुन रिपोर्ट दिली की, दि. १२/०२/२०१८ चे ०८.३० वा. दरम्यान वैनगंगा नदीचे पाण्यात मोठया पुलीयाचे खाली १ मृतक जयलाल शामा बांडेबुचे वय ६४ वर्ष रा. दहेगाव याचे प्रेत मृत अवस्थेत मिळुन आल्याने, फिर्यादी सौ. शालु शामराव शेन्द्रागडे वय २९ वर्ष, रा. कारधा पोलीस पाटील यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन मुलीची आत्महत्या केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ११/०२/२०१८ चे २१.१३ वाजता दरम्यान यातील मृतक कु. किरण शिवशंकर ठवकर वय १९ वर्ष रा. ढिवरवाडा हीने किरायाचे रूम मध्ये स्लॅपचे हुकाला स्कार्पने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी उत्तम पुरूषोत्तम चांदेवार वय ४३ वर्ष, रा. संत कोलबा स्वामी वार्ड चांदणी चौक भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गभने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :-**

दिनांक १२/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा,मोहाडी,वरठी,आंधळगाव, गोबरवाही पालांदुर , अडयाळ, पवनी येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ११४ लिटर हातभट्टी दारू+ १ मोसा. किंमती ५०,४००/रु. व २४ लिटर ६६० मिलीलीटर देशी / विदेशी दारू+ २ सायकल + २ थैली किमती १०००२/रु. तसेच जुगारातुन १,७७०८७/रु. असा एकुन २,३७,४८९/रु. चा माल जप्त करण्यात आला.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १२/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनाकरीता १० ईतर वाहनांवरती – ८१ केसेस करण्यात आले आहे.

(एच.एम. रायपुरे)
स.पो.नि. (नियत्रंण कक्ष अधीकारी)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९७०७३२०७९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.